ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# FUTURE OF PRE PRIMARY, PRIMARY AND SECONDARY TEACHER EDUCATION

**Sagar Kakde, Ph.D.**
*Principal Jai Shriram College of Education Shikrapur*

**Abstract**

*शिक्षक – शिक्षण आराखडयात अध्यापन कौशल्ये अध्यापनाची उदिद्ष्टये आणि अध्यापन संस्कृती हे तीन घटक असतात व त्यात शिक्षक – शिक्षण स्तरानुसार कसे असावे ? कोणती उदिद्ष्टये असावी? ती कशी साध्य केली जावी? याची चर्चा केली जाते व स्तरानुसार शिक्षक – शिक्षणात नवप्रवर्तना नवोपक्रमां राबविले गेल्यास त्या – त्या स्तरानुसार छात्राध्यपकामध्ये वर्तनबदल,मानवी गुणांचा विकास, सामाजिक व तार्किक मूल्यांची रुजवणुक उत्कृष्ठपणे करण्यास मदत होते.*

*शैक्षणिक आकृतीबंधाचा विचार करता असे दिसुन येते की त्याचे मूख्यत्वे ४ भाग केलेले असतात, ते म्हणजे पुर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण या प्रत्येक स्तरावर शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी वेगवेगळे शिक्षक – शिक्षणाचे अभ्यासक्रम तयार केलेले असतात. त्यासाठी यात नवीन बाली प्रवर्तन यांचा सामावेश असावा कारण यात वर्तमान स्वरुपापेक्षा गुणात्मकदृष्टी अधिक येते.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

H.G. Barnet :- " An innovation is any thought behavior or thing that is new and is qualitatively different from the existing forms.

म्हणजेच शिक्षक – शिक्षण आराखडयात अध्यापन कौशल्य, अध्यानाची उदिद्ष्टये आणि अध्यापन संस्कृती हे तीन घटक असतात. अध्यापन संस्कृतीत पुढील गोष्टींचा सामावेश होतो. :–

१) पूर्व प्राथमिक स्तरांसाठी शिक्षक – शिक्षण
२) प्राथमिक स्तरांसाठी शिक्षक – शिक्षण
३) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांसाठी शिक्षक – शिक्षण
४) महाविद्यालयीन स्तरांसाठी शिक्षक – शिक्षण

**१) पूर्व प्राथमिक स्तरांसाठी शिक्षक – शिक्षण :–**

इ. १ली पूर्वी जे शिक्षण दिले जाते त्यास पूर्व प्राथमिक शिक्षण असे म्हणतात. पूर्व प्राथमिक स्तरांसाठी तयार करावयाच्या शिक्षक – शिक्षणाच्या अभ्यासक्रमात वर्तन नमुन्याचा (Behavior Pattern ) समावेश केला जातो. या स्तरावरील शिक्षक तयार करण्यासंबधीची याबाबतीतील उदिद्ष्टे म्हणजे प्रशिक्षणार्थींना सास्कृतिक कार्यक्रम आयोजीत करणे, समाजाशी नाते दृड करणे, विद्यार्थ्याच्या कौटुंबीक वातावरणाचा अभ्यास करणे , कुटंबाशी संबंध दृड करणे , समाजपरिवर्तनाातील आपली भूमीका समजणे इ साठी सक्षम बनविणे, हे होत.

- **भविष्यकाळात वरील उदिद्ष्ठये साध्य होण्यासाठी :—**

अभ्यासक्रमात निरनिराळया अभ्यासानुवर्ती अभ्यासक्रमांचा, खेळांचा, सहलींचा, समाजसेवा या विषयांचा समावेश केलेला असावा. यातुन शिक्षकांचे योग्य वर्तन नमुने बनत असतात व त्यातुनच सामाजिक व सांस्कृतीक विकासासाठी आवश्यक गुण छात्राध्यापकांमध्ये विकसीत कररण्यास मदत होईल.

**२) प्राथमिक स्तरासाठी शिक्षक — शिक्षण**

पूर्व प्राथमिक शिक्षणानंतर व माध्यमिक शिक्षणाच्या आधि विद्यार्थी ज्या स्तरावर शिक्षण घेतात त्यास प्राथमिक स्तर असे म्हणतात. या स्तरावरील शिक्षकांसाठीच्या शिक्षक — शिक्षणातील अध्यापन संस्कृती या घटकांत पुढील गोष्टींचा सामावेश होतो.

१) आधुनिक वर्तन नमुन्याचे ज्ञान

२) समाज परिवर्तनातील शाळेची व शिक्षकांची भूमिका याची जाणिव.

३) लोकशाही प्रक्रियेवर गाढा विश्वास.

या स्तरावर काम करण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी शिक्षक — शिक्षणाची काही उदिद्ष्टये निश्चित केलेली आहेत. त्यात —

विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी घर समवयस्क गट, समाज यांच्या भूमीका जाणुन घेणे, कुटुंबाशी शाळेचे परस्परसंबंध समृध्दीसाठी दृड करणे बदलत्या समाजातील आपली भूमीका समजावण्यास समर्थ करणे इ.

- **भविष्यात वरिल उदिद्ष्टे साध्य करण्यासाठी :—**

प्राथमिक स्तरावरिल शिक्षकांच्या शिक्षण — शिक्षणात आंतरवासिता (Internship) शाळा समाज आंतरक्रिया, समाजसेवा, अभ्यासानुवर्ती उपक्रम व याशिवाय कृतिसंशोधन हे विषय उपक्रमांच्या सहाय्याने साध्य करावे. त्यामुळे छात्राध्यपकात विविध सामाजिक गुणांची वृध्दि् होईल तसेच निकोप मानवी संबंध दृड करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांची वृध्दी् त्यांच्यात होईल व आदर्श समाजाची उभारणी होणे त्यामुळे शक्य होईल.

**३) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरासाठी शिक्षक — शिक्षण :—**

प्राथमिक शिक्षणानंतरचे व उच्च शिक्षणाच्या आधिचे शिक्षण ज्या स्तरावर दिले जाते ता स्तर म्हणजे माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर होय. या स्तरावर काम करण्यासाठी शिक्षण — शिक्षणाचा जो अभ्यासक्रमाच्या आराखडयात पुढील घटकांच्या प्रामुख्याने समावेश असावा.

१) लोकशाही प्रक्रिया आणि मानवी स्वभाव यांचे आकलन

२) राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय शांतता

३) चांगल्या सकारात्मक गुणांच्या महत्वाची जाण

४) वैयक्तिक व्यवसायीक आणि सामाजीक गुणांचा विकास.

**वरील बाबींशी संबंधित या स्तरासाठीच्या शिक्षक शिक्षकाची उदिद्ष्टे**

१) मार्गदर्शन व समुपदेशनाची कौशल्य विकसीत करणे.

२) सौदर्यात्मक संवेदनशिलता विकसीत करणे.

३) विद्यार्थ्याच्या विकासातील घर.

४) समवयस्कांचे गट, समाज यांची भूमीका समजावुन घेणे.

५) समाजपरिवर्तनातील शाळांची भूमिका.

६) प्रकल्प व कृती संशोधन हाती घेणे. भविष्काळात वरील उदिद्ष्टये साध्य करण्यासाठी — अभ्यासक्रमात शालेय अनुभव कार्यक्रम, समामजासमवेत कार्य, सर्जनशीलता आणि व्यक्तिमत्व विकास ,खेळ, कृतिसंशोधन, प्रात्यक्षिक भेटी आयोजीत करणे त्याचा सामावेश असावा. व त्यातुनच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय एकता शांतता प्रस्थापित करता येते. व यासाठी छात्राध्यपकात व्यवसायिक समाजिक विकासासाठी सामाजिक गुण विकसीत करावेत.

**४) महाविद्यालयीन स्तरासाठी शिक्षक — शिक्षण :—**

बी.एड, बी.ए. बी.एड, बी.एस्सी बी.एड अशा वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांना जे शिकविले जाते त्यात पुढील बाबींचा समावेश होतो.

१) सर्जनशिलता वृध्दिगंध करणे.
२) नेतृत्व गुण रुलविणे.
३) सामाजिक सामंजस्य विकसीत करणे.
४) प्रयत्नशिल प्रवृत्ती असणे.
५) अध्यापनाच्या महत्वावर भर .

**या स्तरावर काम करण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी अभ्यासक्रमात पुढील उदिद्ष्टांचा समावेश असावा.**

१) विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक,शारिरीक गरजा जाणुन घेणे.
२) समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन करणे
३) शैक्षणिक संशोधन हाती घेणे
४) सामाजीक बदलांमध्ये शिक्षकांची भूमीका समजुन घेणे
५) लोकशाही धर्मनिरपेक्ष व समाजवादी समाजरचनेची उभारणी करणे

भविष्य काळात वरील उदिद्ष्ठये साध्य करण्यासाठी अभ्यासक्रमात संशोधन असावा मार्गदर्शन व समुपदेशन करण्याची कौशल्ये विकसीत करणे.

पर्यावरण संरक्षणासाठी या विषयाची शिक्षण सक्तिचे करुन त्यातुन सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ज्ञात्राण्याकांना सक्षमक करणे छात्राध्यपकांना सक्षम करणे छात्राध्यपकांमध्ये अध्ययन अनुभवाद्वारे नेतृत्व गुण विकसीत करणे.

अशा प्रकारे प्रत्येक स्तराच्या शिक्षक — शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा अध्यापन संस्कृती हा एक अविभाज्य घटक आहे. अध्यापन कौशल्य या घटकांतर्गत प्रशिक्षणार्थी यांच्यात निरनिराळया अध्यापन पदध्ती तंत्रे यांसंबधीची अध्यापन कौशल्यविकसीत करता येतील. तसेच अध्यापन संस्कृतीचा संबंध यामध्ये सामाजिक आणि तांत्रिक मूल्यांशी असतो. यामध्ये वर्तनबदल Modification of Behaviour मानवी गुणांचा विकास आणि सामाजिक व आदर्शवदी प्रमाणकांची योंग्य दिशेने समृध्दि् यांचा समावेश होतो. यासाठी शिक्षक शिक्षणाचा स्मरानुसार विचार करुन अभ्यासक्रम उदिद्ष्टे राबविले जावे आवश्यक व महत्वाचे ठरते. म्हणुनच शिक्षणात नवोपक्रम नवप्रवर्तन हे प्रयत्नपुर्वक केले पाहिजे.

**म्हणुनच M.B. Meilbox म्हणतात**

“An Innovation is a deliberate, Novel, specific Change which is thought to be more efficious in accomplishing the goals of a system “

**संदर्भ :—**

*कुंडले म. बा. (१९९०) शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे, श्री विद्या प्रकाशन.*
*जगताप ह.ना. (२००७) शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने पुणे नुतन प्रकाशन*
*भिलेगावकरे एस.डी. (२००८) शिक्षक कशक्षण पुणे नित्य नुतन प्रकाशन*
*Aagarwal J.C (2003) Educational Technology and management, Agra, Vinod Pustak Mandir*